माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीत मुदत संपणा-या तसेच काही नव्याने स्थापित अशा एकूण १५६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता राबविण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम रद्द करणेबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.१/का.०८
नवीन प्रशासकीय भवन, पहिला मजला,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२.
दि. १९/११/२०२०

निवडणूक प्राथम्य
ईमेल-द्वारे

**विषय: माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीत मुदत संपणा-या तसेच काही नव्याने स्थापित अशा एकूण १५६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता राबविण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम रद्द करणेबाबत...**

संदर्भ: १) आयोगाचा समक्रमांकाचा दि. ५/२/२०२० चा मतदार यादी कार्यक्रम.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि. २४/२/२०२०चा निवडणूक कार्यक्रम.
३) आयोगाचे समक्रमांकाचे दि. १२/३/२०२० रोजीचे पत्र.
४) आयोगाचे दि. १७/३/२०२० रोजीचे (कोरोना पार्श्वभूमीवर) निवडणूक कार्यक्रम स्थगितीचे आदेश

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आणि ज्याअर्थी, माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीत मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित झालेल्या १५६६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी दि. ५/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात आला होता आणि दि. २४/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येत होता आणि मतदान दि. ३१/३/२०२० रोजी होणार होते;

आणि ज्याअर्थी, मार्च २०२० दरम्यान कोवीड १९ या साथीच्या आजाराच्या संसर्गाची गंभीर परिस्थिती उदभवल्याने चालू असलेली निवडणूक प्रक्रीया पुढे राबविणे जनहिताचे नसल्याने, आयोगाने जाणीवपूर्वक निर्णय घेवून दिनांक १७/३/२०२० रोजी चालू असलेली निवडणूक प्रक्रीया आहे त्या टप्प्यावर स्थगित केली;

आणि ज्याअर्थी, या संदर्भाधीन १५६६ ग्रामपंचायत निवडणूकांचा दि. १७/३/२०२० रोजी नामनिर्देशन पत्र छाननीचा टप्पा सुरू होता, वरील स्थगिती आदेशाने सदर निवडणूक आहे त्या टप्प्यावर

स्थगित झाली. परंतु, दि. १७/३/२०२० हा छाननीचा दिनांक असल्यामुळे व निवडणूक स्थगितीचा आदेश त्याच दिवसाचा असल्यामुळे व ही प्रक्रीया राज्यभरातील १९ जिल्हयात सूरू असल्यामुळे स्थगितीचे आदेश पोहोचेपर्यंत काही ठिकाणी छाननीची प्रक्रीया पूर्ण झाली तर काही ठिकाणी पूर्ण होवू शकली नाही;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर केंद्र व राज्य शासनाने सर्व परिस्थितीचा आढावा घेत प्रथम संपूर्ण लॉकडाउन जाहिर केले आणि त्यानंतर कोवीड १९ या साथीच्या आजाराच्या परिस्थितीचा आढावा घेत टप्प्याटप्प्याने लॉकडाउनमध्ये शिथिलता जाहिर केली. याचदरम्यान भारत निवडणूक आयोगाने बिहार विधानसभेच्या निवडणूका घेतल्या तसेच काही राज्य निवडणूक आयोग जसे राजस्थान, केंद्र शासित प्रदेश यांनी तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या आहेत. सदर निवडणूका घेताना कोवीड १९ बाबत विशेष मार्गदर्शक तत्वे अवलंबिण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, या १५६६ ग्रामपंचायतीतील नामनिर्देशनपत्र छाननीची प्रक्रीया विविध स्तरावर स्थगित झाली, आणि कोरोना संसर्गाच्या दरम्यान ८ महिन्याचा काळ उलटून गेला असून या १५६६ गावांमध्ये कोरोनामुळे झालेल्या घडामोडी विचारात घेता या सर्व ठिकाणी नव्याने निवडणूक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, या १५६६ ग्रामपंचायतींच्या निवडणूक प्रक्रीयेवरील स्थगिती उठवून निवडणूक घेण्याचा निर्णय घेताना असे निदर्शनास आले की, या ग्रामपंचायतीच्या मतदार याद्या दि. ३१/१/२०२० पर्यंत अद्ययावत केलेल्या व अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून तयार करण्यात आल्या होत्या तसेच सदर विधानसभा मतदार यादी दि. १ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत होती व भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी, २०२० या अर्हता दिनांकावर आधारीत अद्यावत मतदार यादी ही दि. २५/९/२०२० रोजी प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे दि. १/१/२०२० या अर्हता दिनांकावर समाविष्ट झालेले मतदार यादीतील सर्व मतदारांना मतदान करण्याची तसेच नव मतदारांना निवडणूक लढविण्याची संधी मिळणे हे लोकशाहीच्या मुलभूत तत्वांनुसार आवश्यक आहे. अशा बदललेल्या परिस्थितीत दि. १/१/२०१९ अर्हता दिनांकावर आधारीत जुनी मतदार यादी उपरोक्त स्थगित ग्रामपंचायत निवडणुकांसाठी वापरणे योग्य होणार नाही.

त्याअर्थी, या १५६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकीचा दि. २४/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम आणि दि. ५/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेला मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे, न्याय्य व मुक्त निवडणूका होण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र ग्रामपंचायत

अधिनियम, (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वरील कोवीड १९ संसर्ग, निवडणूक प्रक्रीया स्थगितीतील भिन्न परिस्थिती, स्थगितीचा प्रदिर्घ काळ विचारात घेवून माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीत मुदत संपलेल्या व काही नव्याने स्थापित झालेल्या अशा एकूण १५६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांचा दि. २४/२/२०२० रोजीचा निवडणूक कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे.

२. माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीत मुदत संपलेल्या व काही नव्याने स्थापित झालेल्या अशा एकूण १५६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांचा दि. ५/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमास अनुसरून तयार करण्यात आलेली मतदार यादी ही १ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत असल्याने, आता १ जानेवारी, २०२० या अर्हता दिनांकावर आधारीत अद्यावत यादी उपलब्ध असल्याने; या सर्व नवीन मतदारांचा समावेश होणे न्यायिक असल्याने दि. ५/२/२०२० च्या आदेशान्वये तयार करण्यात आलेली मतदार यादी रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत आदेशास स्थानिक वर्तमान पत्रातून तसेच अन्य मार्गाने विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.

४. या १५६६ ग्रामपंचायतींचा मतदार यादी कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम नव्याने जाहिर करण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरूदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व) (वगळून मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्हा)
प्रत - १. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन
२.विभागीय आयुक्त.
३.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.
४.राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.
५.निवड नस्ती